

दापोली औद्योगिक क्षेत्रात अखंडित वीज पुरवठ्यासाठी स्वतंत्र विद्युत उपकेंद्राचे काम ८ दिवसात मार्गी लावा

पान ३

शब्दांना सत्याची धार

# प्रहार

नेटवर्क नसल्याने केंद्रप्रमुखांनी विद्यार्थ्यांची घेतली थेट झाडावरच्या माचावर परीक्षा

पान ८



रत्नागिरी ● रविवार १४ सप्टेंबर, २०२५ | RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३५१८० ● वर्ष २१ ● अंक ३०२ ● पाने ८ ● ₹ ५.०० | www.prahaar.in epaper.prahaar.in

# मराठा समाजाला कोणते आरक्षण कायम ठेवायचे?

**एसईबीसी अंतर्गत १० टक्के की ओबीसीमधून मिळणार आरक्षण** | **मराठा समाजाच्या दोन आरक्षणावर न्यायालयाचा सवाल** | **मराठा आरक्षणावर ४ ऑक्टोबरला पुढील सुनावणी** | **आरक्षणावरुन मराठा - ओबीसी समाजात वाद**

**मुंबई (प्रतिनिधी)**

मराठा समाजाला देण्यात आलेल्या १०% आरक्षणावर मुंबई उच्च न्यायालयात शनिवारी सुनावणी पार पडली. न्यायमूर्ती रवींद्र घुगे, न्यायमूर्ती एन जे जमादार आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठासमोर आरक्षणाच्या समर्थनार्थ तसेच विरोधात दाखल झालेल्या याचिकांवर दिवसभर युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. सुनावणीदरम्यान न्यायपीठाने राज्य सरकारला थेट विचारणा केली की, "सध्या मराठा समाजाला दोन प्रकारची आरक्षणे उपलब्ध असल्याचे दिसते. मग सरकारने यापैकी कोणते कायम ठेवायचे याबाबत निर्णय घेतला आहे का?" असा प्रश्न उपस्थित झाला. न्यायालयाच्या या थेट प्रश्नामुळे राज्य सरकारच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले.आता पुढील सुनावणी ४ ऑक्टोबरला होणार आहे.




मराठा समाजाला एसईबीसी अंतर्गत १० टक्के की ओबीसीमधून आरक्षण, कोणते आरक्षण द्याल. कोणते आरक्षण कायम ठेवाल, अशी विचारण मुंबई उच्च न्यायालयाने सरकारला केलीय. एसईबीसी अंतर्गत मराठा समाजाला देण्यात आलेल्या दहा टक्के आरक्षणावरून मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली. या सुनावणीत न्यायालयाने सरकारला प्रश्न केलाय. पूर्ण पिठासमोर आरक्षणाच्या समर्थनार्थ तसेच विरोधात दाखल झालेल्या

(पान २ वर)

## राज्याच्या विकासासाठी शांतता हवी

### मणिपूरमधील संघटनांना पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आवाहन

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

भारत सरकारचा प्रयत्न आहे की मणिपूरला विकासाच्या मार्गावर पुढे न्यायचे आहे. यासाठीच मी तुमच्या राज्यात आलो आहे. याच व्यासपीठावरून ७ हजार कोटींच्या प्रकल्पाची पायाभरणी झाली. मणिपूरच्या सर्व लोकांना या योजनांसाठी शुभेच्छा देतो. मणिपूरची संस्कृती आणि परंपरा भारताचे मोठे सामर्थ्य आहे. मणिपूर बॉर्डरला लागून असणारे राज्य आहे. इथे कनेक्टिव्हीटी मोठे आव्हान राहिले आहे. राज्यात विकास करायचा असेल तर शांतता राखणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी पुर्वोत्तर राज्यांच्या दौऱ्यावर आहेत. १३ ते १५ सप्टेंबर या कालावधीत पंतप्रधान मोदी मिझोराम, मणिपूर, आसाम, पश्चिम बंगाल आणि बिहार या राज्यांचा दौरा करणार आहेत. यावेळी मणिपूरमध्ये अलिकडच्या काही वर्षात सुरू असलेल्या हिंसाचाराच्या घटना आणि परिस्थितीवरही त्यांनी भाष्य केले. चांगले रस्ते नसल्याने सहन करावा लागणारा त्रास समजू शकतो. २०१४ पासून मणिपूरची कनेक्टिव्हीटी वाढवण्यासाठी काम करण्यावर जोर दिला. यासाठी भारत सरकारने दोन पातळीवर

(पान २ वर)



**मुलांचे भविष्य चांगले बनवावे**

गेल्या दोन ते तीन वर्षांपासून मणिपूरमध्ये हिंसाचाराची आग भडकली आहे. यासंदर्भात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, मणिपूरची ही भूमी ही आशेची भूमी आहे. पण इथल्या माणसाने या भूमीला त्यांच्या ताब्यात घेतले होते. थोड्या वेळापूर्वी मी यामुळे प्रभावित झालेल्या लोकांना भेटलो. त्यांच्याशी बोलल्यानंतर मी सांगू शकतो की आशा आणि विश्वासाची नवी सकाळ मणिपूरमध्ये येत आहे. कोणत्याही ठिकाणी विकासासाठी शांतता गरजेची आहे. गेल्या ११ वर्षात पुर्वोत्तर राज्यात

(पान २ वर)

## वेचक

### रशियात भूकंपाचे धक्के

**कामचटका:** रशियाच्या कामचटका द्वीपकल्पाच्या पूर्व किनाऱ्याजवळ शनिवारी सकाळी जोरदार भूकंपाचे धक्के जाणवले. या भूकंपाची तीव्रता ७.१ रिश्टर स्केल इतकी नोंदवली गेली आहे. त्यानंतर, त्सुनामीचा इशारा जारी करण्यात आला आहे. जर्मन रिसर्च सेंटर फॉर जिओसायन्सेस ने सांगितले की, भूकंपाची खोली सुमारे १० किलोमीटर होती. दरम्यान, अमेरिकन भूगर्भीय सर्वेक्षणने या भूकंपाची तीव्रता ७.४ आणि खोली ३९.५ किलोमीटर नोंदवली आहे. पॅसिफिक त्सुनामी वॉर्निंग सेंटरने हा भूकंप त्सुनामीच्या लाटा निर्माण करू शकतो, असा इशारा दिला आहे. हे तेच क्षेत्र आहे, जिथे जुलैमध्ये ८.८ रिश्टर स्केलचा शक्तिशाली भूकंप आला होता. त्यामुळे प्रशांत महासागरातील अनेक देशांमध्ये त्सुनामीचा इशारा देण्यात आला होता. जपानच्या सार्वजनिक प्रसारक एनएचकेनुसार, जपान हवामान विज्ञान एजन्सीने सध्या कोणताही त्सुनामीचा इशारा जाहीर केलेला नाही.

(सविस्तर वृत्त पान ४ वर)

### 'एसटी'तून आरक्षणासाठी बंजारा युवकाची आत्महत्या

**धाराशिव :** मराठा आरक्षणासाठी हैदराबाद गॅझेट लागू केल्यानंतर त्याच गॅझेटप्रमाणे बंजारा समाजाला अनुसूचित जमातींमधून आरक्षण द्या, अशी मागणी होत आहे. या मागणीसाठी धाराशिवमधील मुरुम गावच्या युवकाने सुसाईड नोट लिहून आत्महत्या केली. पवन गोपीचंद चव्हाण असे ३२ वर्षीय युवकाचे नाव असून तो पदवीधर बेरोजगार आहे. मृत तरुणाच्या पश्चात आई-वडील, पत्नी आणि दोन मुले असे कुटुंब आहे. बंजारा समाजाला हैद्राबाद गॅझेटप्रमाणे आरक्षण मिळावे, अशा आशयाची सुसाईड नोट मृत युवकाने लिहून ठेवली आहे. पवनने बंजारा आरक्षणासाठी आत्महत्या केल्याचा नातेवाईकांचा दावा आहे. जालना येथील बंजारा आरक्षण आंदोलनातून परतल्यानंतर त्याने हे दुर्दैवी पाऊल उचलले. मुरूम येथून जवळच असलेल्या नाईक नगर येथील पदवीधर युवक पवन गोपींचद चव्हाण याने शनिवारी, सकाळी अकरा वाजता राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केली.

### वर्गमित्रांचे प्रताप; झोपेत असताना डोळ्यात टाकलं फेविक्विक; ८ विद्यार्थ्यांचे चिकटले डोळे

**कंधमाल :** ओडिशाच्या कंधमाल जिल्ह्यातील फिरिंगिया ब्लॉकमधील सलागुडा येथील सेवाश्रम शाळेतून एक विचित्र घटना समोर आली आहे. सर्व विद्यार्थी झोपलेले असताना काही वर्गमित्रांनी ८ विद्यार्थ्यांच्या डोळ्यात फेविक्विक टाकलं. त्यामुळे विद्यार्थ्यांचे डोळे चिकटले आणि त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. सेवाश्रम शाळेच्या वसतिगृहात ही घटना घडली. सध्या जिल्हाधिकाऱ्यांनी या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, सेवाश्रम शाळा कंधमाल जिल्ह्यातील फिरिंगिया ब्लॉकमधील सालागुडा येथे आहे. येथे शुक्रवारी रात्री विद्यार्थी वसतिगृहात झोपले असताना काही वर्गमित्रांनी

(पान २ वर)

## भारताची पहिली फ्लॅश चार्ज इलेक्ट्रिक बस लवकरच सुरू होणार

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूरमध्ये केली मोठी घोषणा

**नागपूर (प्रतिनिधी)**



नागपूरमध्ये लवकरच भारताची पहिली फ्लॅश चार्ज इलेक्ट्रिक बस सेवा सुरू होणार आहे, ज्यामुळे सार्वजनिक वाहतुकीच्या क्षेत्रात एक क्रांती घडेल. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर शहरासाठी एका महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची घोषणा केली आहे.

फ्लॅश चार्ज हे एक अत्याधुनिक तंत्रज्ञान आहे. या तंत्रज्ञानामुळे इलेक्ट्रिक बसची बॅटरी अवघ्या काही मिनिटांत किंवा सेकंदांत पूर्ण चार्ज होते. बस आपल्या थांब्यावर आल्यावर तिथेच बसलेल्या विशेष चार्जिंग युनिटशी ती जोडली जाते आणि पुढील प्रवासासाठी आवश्यक ऊर्जा लगेचच मिळते. यामुळे बसला लांब अंतराच्या प्रवासासाठी चार्जिंग स्टेशनवर जास्त वेळ थांबावे लागणार नाही.

पारंपरिक इलेक्ट्रिक बसेसना चार्ज होण्यासाठी तासनतास लागतात. फ्लॅश चार्जमुळे हा वेळ वाचेल आणि बस अधिक फेऱ्या मारू शकेल, ज्यामुळे सार्वजनिक वाहतूक अधिक कार्यक्षम बनेल. हा प्रकल्प यशस्वी झाल्यास,

(पान २ वर)

## भारतीय कृषी विमा कंपनीला काळ्या यादीत टाकण्याची शिफारस कृषी आयुक्तालयाकडे करा; ना. नितेश राणे यांचे निर्देश

**सिंधुदुर्गनगरी (प्रतिनिधी)**

पुनर्रचित हवामानावर आधारित फळपिक विमा योजना आंबिया बहार सन २०२४-२५ अंतर्गत कृषी विभागाकडून सातत्याने पत्रव्यवहार करून देखील भारतीय कृषी विमा कंपनीने नुकसान भरपाईचा तपशील तसेच क्षेत्रीय तपासणीचा सविस्तर तपशील उपलब्ध करून दिलेला नाही. त्यामुळे भारतीय कृषी विमा कंपनीवर दंडात्मक कारवाई करण्याची तसेच काळ्या यादीत टाकण्याची शिफारस कृषी आयुक्तालयास करण्याचे निर्देश सिंधुदुर्गचे पालकमंत्री ना.नितेश राणे यांनी जिल्हा प्रशासनाला दिले.

पत्रव्यवहार करुन देखील राज्यस्तरीय विमा प्रतिनिधी या बैठकीला उपस्थित राहिले नसल्याने पालकमंत्री नितेश राणे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

सन २०२५-२६ करिता या विमा कंपनी ऐवजी इतर विमा कंपनीची नियुक्ती करावी असे देखील पालकमंत्र्यांनी निर्देशित केले. पालकमंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विमा कंपनीचे राज्यस्तरीय प्रतिनिधी, स्कायमेट वेदर कंपनीचे प्रतिनिधी व कृषी विभाग यांची एकत्रित बैठक जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांच्या दालनामध्ये आयोजित केली होती. यावेळी जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, मुख्य कार्यकारी अधिकारी

(पान २ वर)



## पाकिस्तानात मोठा दहशतवादी हल्ला; लष्कराची बस स्फोटाने उडवली

### १२ सैनिकांचा मृत्यू

**इस्लामाबाद**

पाकिस्तानच्या दक्षिण वजिरीस्तानात मोठा दहशतवादी हल्ला झाला आहे. दक्षिणी वजिरीस्तानातील बादर खोऱ्यातील अपर जिल्ह्यात सैनिकांच्या तुकडीवर भीषण हल्ला झाला आहे. त्यात किमान १२ सैनिकांचा मृत्यू झाला आहे. तर ४ गंभीर जखमी झाले आहेत. पाकिस्तानी सैन्यानं हल्ल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. हल्ला अतिशय नियोजनबद्ध पद्धतीनं करण्यात आला. तो इतक्या वेगानं करण्यात आला की सैनिकांना त्वरित प्रत्युत्तर देता आलं नाही, असं स्थानिक सुरक्षा दलांकडून सांगण्यात आलं आहे.

तेहरिक-ए-तालिबान पाकिस्तान (TTP) या दहशतवादी संघटनेनं हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे. हल्ल्यादरम्यान पाकिस्तानी सैन्याची शस्त्रंही पळवल्याचा दावा संघटनेनं केला आहे. या हल्ल्यामुळे या

(पान २ वर)

## मोसमी पावसाला आता परतीचे वेध

**मुंबई**

मोसमी पावसाला आता परतीचे वेध लागले असून नैऋत्य मोसमी पाऊस १५ सप्टेंबरच्या आसपास वायव्य भारतातून माघार घेण्यास सुरुवात करू शकतो, असे भारतीय हवामान विभागाने सांगितले आहे.

यंदा संपूर्ण देशात नऊ दिवस आधीच दाखल झालेला मान्सून परतीच्या निघण्याचे संकेतही दीर्घकालीन सर्वसाधारण वेळेच्या आधीच आहेत. वायव्य भारतात पावसाने सलग पाच दिवस उघडीप देणे, आर्द्रतेची टक्केवारी कमी होऊन कोरडे हवामान होणे, वाऱ्यांची दिशा बदलण्याबरोबरच परिसरावर घड्याळाच्या काट्याच्या दिशेने केंद्रभागातून बाहेरच्या बाजूला वारे वाहणारी क्षेत्रे (ॲण्टी सायक्लोन) तयार होणे आवश्यक असते. यापूर्वी १ ऑक्टोबर ही मान्सूनच्या परतीची सर्वसाधारण तारीख होती. हवामान विभागाने २०२५ मध्ये मान्सूनचे आगमन आणि परतीच्या प्रवासाचे दीर्घकालीन सर्वसाधारण तारखांचे सुधारित वेळापत्रक जारी केले.

पश्चिम राजस्थानच्या काही भागातून १५ सप्टेंबरच्या आसपास पावसाची माघारीसाठी परिस्थिती अनुकूल होत असल्याचे आयएमडीने सांगितले. मोसमी पाऊस साधारणतः १ जूनपर्यंत केरळमध्ये प्रवेश होतो

(पान २ वर)



**१५ सप्टेंबरपासून माघारीची शक्यता**

## लांजातील मठ येथे गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

**लांजा (प्रतिनिधी)**

बावीस वर्षीय तरुणाने आंब्याच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना शनिवारी १३ सप्टेंबर रोजी सकाळी ११.१५ वाजण्याच्या सुमारास मठ येथे घडली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या घटनेची खबर राजेश शांताराम मठकर (वय ४४, रा. मठ मठकरवाडी) यांनी लांजा पोलिसांनी दिली. त्यांचा मुलगा भूषण हा घरातील गणपतीची हातगाडी ही वरच्या घरी ठेवून येतो, असे सांगून शुक्रवारी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास घरातून निघून गेला होता. मात्र तो घरी न परतला नाही तसेच त्याच्या मोबाईलवर संपर्क होत नव्हता. त्यामुळे वडील राजेश मठकर यांनी शनिवारी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास पुन्हा मुलगा भूषण याच्या मोबाईलवर कॉल केला असता तो कव्हरेज क्षेत्राच्या बाहेर

(पान २ वर)

## मतदार यादी बनवणे आणि बदलणे आमचे काम : एसआयआर करणे हा विशेष अधिकार




### सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आमच्या कामात हस्तक्षेप: निवडणूक आयोगाचे प्रतिज्ञापत्र दाखल

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

देशभरात वेळोवेळी विशेष सघन पुनरावृत्ती (एसआयआर) करणे हा आमचा विशेषाधिकार आहे. जर न्यायालयाने यासाठी आदेश दिला तर तो अधिकारात हस्तक्षेप ठरेल.निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात एक प्रतिज्ञापत्र दाखल केले. ज्यामध्ये ही भूमिका स्पष्ट केली आहे.

न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात आयोगाने म्हटले आहे की, संविधानाच्या कलम ३२४ नुसार, मतदार यादी तयार करणे आणि त्यात वेळोवेळी बदल करणे हा फक्त निवडणूक आयोगाचा (EC) अधिकार आहे. हे काम इतर कोणत्याही संस्थेला किंवा न्यायालयाला देता येणार नाही.

निवडणूक आयोगाने म्हटले आहे की, आम्ही आमची जबाबदारी समजून घेतो आणि मतदार यादी पारदर्शक ठेवण्यासाठी सतत काम करतो. हे प्रतिज्ञापत्र अधिवक्ता अश्विनी कुमार उपाध्याय यांच्या याचिकेवर दाखल करण्यात आले आहे. याचिकेत अशी मागणी करण्यात आली होती की,निवडणूक आयोगाला भारतात विशेषतः निवडणुकीपूर्वी एसआयआर करण्याचे निर्देश द्यावेत, जेणेकरून देशाचे राजकारण आणि धोरण केवळ भारतीय नागरिकच ठरवू शकतील.

५ जुलै २०२५ रोजी, निवडणूक आयोगाने बिहार वगळता सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना (सीईओ) एक पत्र पाठवले होते, ज्यामध्ये त्यांना १ जानेवारी २०२६ या पात्रता तारखेच्या आधारे एसआयआर तयार करण्यास सुरुवात करण्याचे निर्देश दिले होते.

कलम २१ नुसार, मतदार यादीत बदल करण्यासाठी कोणतीही निश्चित कालमर्यादा नाही. उलट, ही एक सामान्य जबाबदारी आहे, जी प्रत्येक सार्वत्रिक निवडणूक, विधानसभा निवडणूक किंवा जागा रिक्त झाल्यावर होणाऱ्या पोटनिवडणुकीपूर्वी पूर्ण करणे

(पान २ वर)

## पुण्यातील मंचर येथे दर्ग्याखाली आढळले भुयार

### हिंदू संघटनांकडून सर्व्हेची मागणी

**जुन्नर (प्रतिनिधी)**

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यात असलेल्या मंचर शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या चावडी चौकात रस्त्याचे काम सुरू असताना येथील दर्ग्याचा एक भाग कोसळला. त्यानंतर कोसळलेल्या भागाखाली भुयारासारखी रचना दिसून आली. या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली असून हिंदू संघटनांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच मुस्लीम समुदायातील लोकही जमले. दरम्यान, पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत दोन्ही समुदायांची समजूत घालत परिस्थिती नियंत्रणात आणली. या भुयाराची पुरातत्व विभागाकडून पाहणी करण्यात यावी, अशी मागणी हिंदुत्ववादी संघटनांकडून करण्यात आली आहे. भुयारासारखी रचना आढळल्यानंतर या ठिकाणी जेसीबी

(पान २ वर)



## मुंबईकरांना यंदा पाण्याचे 'नो टेन्शन'

### पुरवठा करणाऱ्या धरण, तलाव क्षेत्रांतील पाणी साठा ९८.४० टक्के

**शेवटच्या १७ दिवसांत १.६० टक्के साठ्याचे टार्गेट**

**मुंबई (प्रतिनिधी)**

मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या सर्व धरण आणि तलावांमधील पाणी साठा आता वाढत चालला असून सर्व धरणांमध्ये मिळून एकूण ९८.४० टक्के अर्थात १४ लाख २४ हजार १६४ दशलक्ष लीटर पाण्याचा साठा जमा झाला आहे. त्यामुळे येत्या १७ दिवसांमध्ये १०० टक्के पाणीसाठा जमा झाल्यास मुंबईकरांची वर्षभराची तहान भागवणे शक्य होणार आहे.

मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या अप्पर वैतरणा, मोडकसागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार आणि तुळशी यासर्व धरणांमधील पाणी साठा हा १४ लाख २४ हजार १६४ अर्थात १लाख ४२ हजार ४१६ कोटी लीटर एवढा जमा झाला आहे. मुंबईकरांची वर्षभराची तहान भागवण्यासाठी लागणाऱ्या १४ लाख ४७ हजार ३६३ दशलक्ष लीटर अर्थात १ लाख ४२ हजार ४१६ कोटी लीटर एवढा पाणी साठा आवश्यक असतो. त्यातुलनेत आता यासर्व धरणांमध्ये ९८.४० टक्के एवढा पाणी साठा जमा झाला आहे. मुंबईला होणाऱ्या पाणी पुरवठ्याचे नियोजन हे ३० सप्टेंबरपर्यंत जमा होणाऱ्या पाणी साठ्याच्या आधारे केले जाते. त्यामुळे येत्या १ ऑक्टोबर २०२५ रोजी जो पाणी साठा असेल त्यावर मुंबईच्या वर्षभरातील पुरवठ्याचे नियोजन केले जाणार आहे. त्यामुळे सध्या ९४.४० टक्के एवढा पाणी साठा असला तरी येत्या १७ दिवसांमध्ये तलाव तथा

(पान २ वर)

## हत्ती हटेना... वनविभाग पथक हतबल!

### 'ओंकार' हत्तीचा नेतर्डे धनगरवाडीत मुक्काम

**बांदा (प्रतिनिधी)**

दोडामार्ग तिलारी परिसरातून वाट चुकलेला 'ओंकार'हा टस्कर हत्ती सध्या सावंतवाडी तालुक्यातील नेतर्डे धनगरवाडी परिसरात स्थिरावला आहे. या अनपेक्षित पाहुण्यामुळे स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वनविभाग आणि स्थानिक ग्रामस्थ त्याला सुखरूप

(पान २ वर)

## पोर्टल बंद असल्याने हजारो विवाहांची नोंदणी रखडली

**जुन्नर (प्रतिनिधी)**

राज्यभरातील ग्रामपंचायतींमध्ये कार्यरत असलेले ग्रामपंचायतींचे विवाह नोंदणी पोर्टल तब्बल सहा महिन्यांपासून बंद असल्याने नवदांपत्यांचे मोठे हाल होत आहेत.

पोर्टल बंद असल्यामुळे विवाह नोंदणी ऑनलाइन प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याने त्याचा परिणाम थेट वधू-वरांवर होत आहे. वधूच्या नावाने बँकेत खाते उघडणे, विमा हक्क मिळवणे, शासकीय योजना व कागदपत्रांवर नवऱ्याचे नाव नोंदवणे या महत्त्वाच्या कामांवर अडथळे निर्माण झाले आहेत. काही ग्रामपंचायतींनी पुणे जिल्हा परिषदेकडून मिळालेल्या सूचनेनुसार हस्तलिखित दाखले दिले असले तरी हे प्रमाणपत्र आधार कार्ड, बँक व विमा कंपन्यांच्या संगणकीय प्रणालीशी लिंक होत नसल्याने नवदांपत्यांना फटका बसत आहे.

सध्या पत्नीच्या नावावर अद्याप माहेरचीच माहिती दिसत असल्याने नवविवाहित जोडप्यांना विविध लाभ व सोयीपासून वंचित राहावे लागत आहे. आपले सरकार सेवा केंद्र पोर्टलमध्ये विवाह नोंदणीचा समावेश करून तातडीने विवाह नोंदणी प्रक्रिया सुरळीत करण्याची मागणी कळंब गावातील तंटामुक्तीचे अध्यक्ष महेश भालेराव यांनी केली आहे.

दरम्यान विवाह नोंदणी प्रक्रियेबाबत आरोग्य सेवा व निबंधक तथा विवाह मंडळ विवाह नोंदणीचे राज्याचे उपसंचालक डॉ. आर. टी. वाघमारे यांनी ८ ऑक्टोबर २०२४ रोजी ग्रामपंचायतींना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, 'सदर

(पान २ वर)

